# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## डिसेंबर २०२४

# ई वार्ता




**LEGEND**

| Symbol | Description | No. |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| ☆ | Post Graduate Institute | 01 |
| ۞ | Agril. Technology Information Centre | 01 |
| ⚘ | Regional Extension Centre | 04 |
| ✹ | District Extension Centre | 05 |
| ❄ | Krishi Vigyan Kendra | 04 |
| ✖ | Agricultural Tech. School | 08 |
| ✪ | Agricultural Engg. College | 02 |
| ★ | Agricultural College | 08 |
| ⊟ | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२७६३/२०२५

## मोहोळ कृषि विज्ञान केंद्रातील शेजबाभूळगावच्या शेतकऱ्यांचा मुख्यमंत्र्यांनी केला सन्मान



**दि. २३ डिसेंबर, २०२४.** राष्ट्रीय किसान दिनानिमित्त पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी शेजबाभुळगाव (ता. मोहोळ) येथील काजू उत्पादक शशिकांत पुदे, सिताफळ उत्पादक श्री. राजकुमार आतकरे यांना सन्मानित केले. यावेळी देशाचे कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. सोलापूर हा अवर्षण प्रवण क्षेत्रातून या भागामध्ये काजू सारखं पिक जोमाने येत आहे. शेतकऱ्यांना हा एक पर्याय उपलब्ध होऊ शकतो. पुदे खिलार गोवंश आणि सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मार्गदर्शक असून त्यांच्या अनुभवाचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना फायदा होत आहे. श्री. राजकुमार आतकरे यांनी सिताफळ पिकाच्या प्रक्रियेतून सीताफळ पल्पच्या माध्यमातून विविध उत्पादने तयार केली. सीताफळ रबडी, आईस्क्रीम, कुल्फी यासारखे अनेक पदार्थ निर्मिती करून सोलापूर जिल्ह्यामध्ये राजाराणी नावाने एक ब्रँड निर्माण केला आहे. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. जी.के. ससाणे, पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलास कृषि मंत्री मा.ना.श्री. माणिकराव कोकाटे यांची भेट





**दि. २६ डिसेंबर, २०२४.** कृषिमंत्री झाल्यानंतर प्रथमच मा.ना.श्री. माणिकराव कोकाटे व शालेय शिक्षण मंत्री मा.ना.श्री. दादाजी भुसे यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यरत असलेले व नव्याने सुरू झालेले छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलास भेट देऊन तेथील कामांची पाहणी केली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके व संकुलातील प्राध्यापक डॉ. सोमनाथ सोनवणे उपस्थित होते. यावेळी मा.ना.श्री. माणिकराव कोकाटे मार्गदर्शन करतांना म्हणाले की शेतकऱ्यांच्या तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काष्टी येथे उभारलेल्या कृषि विज्ञान संकुलाचे महत्त्व मोठे आहे. दूरदृष्टी आणि अथक प्रयत्नांमुळे उभ्या राहिलेल्या या कृषि संकुलाने महाराष्ट्राच्या कृषि क्षेत्राला नवी दिशा मिळेल. यावेळी डॉ. सचिन नांदगुडे यांनी कृषि विज्ञान संकुलातील आधुनिक पायाभूत सुविधा, विविध महाविद्यालये, वसतीगृहे, संशोधन प्रकल्प आणि शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या शैक्षणिक व प्रशिक्षण संधी याबद्दल मान्यवरांना सविस्तर माहिती दिली. यावेळी या प्रकल्पाचे ठेकेदार श्री. पवार, श्री. राजेंद्रभैय्या भोसले तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

वर्ष :४, अंक क्रं. : ४८, डिसेंबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि परिषदेचे उपाध्यक्ष व महासंचालक यांची गणेशखिंड येथील विभागीय कृषि संशोधन केंद्रास भेट



**दि. १४ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या गणेशखिंड जि. पुणे येथील विभागीय कृषि संशोधन केंद्रास महाराष्ट्र कृषि शिक्षण आणि संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष मा. ना. श्री. तुषार पवार यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीत त्यांनी पेशवेकालीन आंबा, फणस, काजू या फळबागांची तसेच फुले आणि भाजीपाला सुधार प्रकल्प, रोपवाटिका, माळी प्रशिक्षण वर्ग आणि जैवविविधता प्रक्षेत्र यांची पाहणी केली व संशोधकांशी चर्चा केली. या भेटीदरम्यान ना. श्री. तुषार पवार यांचे शुभहस्ते रोपवाटिकेत वृक्षारोपण करून माळी प्रशिक्षण वर्गाच्या नवीन इमारतीची पाहणी केली. या भेटीदरम्यान विभागीय कृषि संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. विष्णू गरंडे यांनी जैवविविधतेचे संवर्धन तसेच केंद्रावर चालू असणारे नवीन संशोधन व केंद्रावर असणाऱ्या सुविधा याबाबत माहिती दिली. यावेळी मा.ना. श्री. तुषार पवार यांनी संशोधन केंद्रावर गरजेच्या असणाऱ्या प्रशासकीय इमारत, शेतकरी, विद्यार्थी यांच्यासाठी सुसज्ज सेमिनार हॉल तसेच कर्मचारी वसाहत यांच्या बांधकाम व नूतनीकरणाबद्दल सकारात्मक प्रतिसाद आणि निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी विभागीय कृषि संशोधन प्रकल्पातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दुपारच्या सत्रात कृषि आयुक्त व महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे यांनी विभागीय कृषि संशोधन केंद्रास सदिच्छा भेट देऊन केंद्राच्या संशोधनाचा आढावा घेतला व विकास कामांची पाहणी केली. या भेटीदरम्यान सहयोगी संशोधन संचालक डॉ. विष्णू गरंडे यांनी प्रकल्पामध्ये चालू असलेले संशोधनाची माहिती दिली. यावेळी श्री. भागडे यांनी गणेशखिंड येथील जैवविविधता प्रक्षेत्रावरील विविध वनस्पतींची माहिती घेऊन पेशवेकालीन आंब्याच्या झाडाची पाहणी केली. यावेळी कृषि परिषदेचे संचालक डॉ. हरिहर कौसडीकर तसेच विभागीय कृषि संशोधन प्रकल्पातील डॉ. दत्तात्रय लाड, डॉ. सतीश जाधव व डॉ. सुनील लोहाटे उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये प्राध्यापक, कर्मचारी यांच्यासाठी द्वितीय शिक्षण या विषयावर व्याख्यानाचे आयोजन



**दि. १७ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे विद्यापीठातील प्राध्यापक, कर्मचारी यांच्यासाठी द्वितीय शिक्षण या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील होते. यावेळी या कार्यक्रमासाठी व्याख्याते म्हणुन देहरादून येथील श्री. सुदर्शन शर्मा उपस्थित होते. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व कुलसचिव डॉ. नितीन दानवले उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील म्हणाले की कामाच्या अति व्यापाने शरीर तसेच मनावर विपरीत परिणाम होत असतात. विद्यापीठातील शास्त्रज्ञ, प्राध्यापक तसेच विद्यार्थीसुध्दा कार्यालयीन कामामुळे अथवा अभ्यासामुळे तणावाची स्थिती अनुभवतात. त्यामुळे त्यांच्या

कार्यालयीन कामावर तसेच अभ्यासावर विपरीत परिणाम होतो. पर्यायाने त्यांच्यामध्ये नकारात्मक विचार वाढून त्याचा गंभीर परिणाम त्यांच्या शरीरावर तसेच मानसिक आरोग्यावर होतो. यावर द्वितीय शिक्षण म्हणजेच ध्यानधारणा हाच उत्तम पर्याय आहे. आपल्या मनात सर्व वेळ विचार येत असतात. त्यामध्ये ९० टक्क्यांपेक्षा जास्त विचार हे नकारात्मक असतात. त्या नकारात्मक विचारांचा वाईट परिणाम आपल्या शरीरासह मनावर होत असतो. त्यामुळे जे पहाल, ऐकाल ते सकारात्मकच पहा. त्याचा प्रभाव तुमच्या अंतर्मनावर पडेल व तुमचा तो दिवस चांगला जाईल. व्याख्याते श्री. सुदर्शन शर्मा यांनी यावेळी द्वितीय शिक्षण या विषयावर मार्गदर्शन करतांना नकारात्मक व सकारात्मक विचार यांचा आपल्या दैनंदिन जीवनातील प्रतिक्रिया व प्रतिसाद याच्यावर कसा परिणाम करतात हे सांगितले. द्वितीय शिक्षणाच्या माध्यमातून आपण सकारात्मक विचार तसेच ध्यानधारणा यांच्या साधनेतून स्वअनुभूती कश्याप्रकारे जागृत करु शकतो याविषयी मार्गदर्शन केले. माणसाने भौतिक विकास खुप केला आहे परंतु आत्मीक विकासावर जास्त भर देण्याची गरज असून त्यासाठी द्वितीय शिक्षणाची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. रवि आंधळे यांनी तर आभार डॉ. साताप्पा खरबडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषि महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता तसेच विभाग प्रमुख, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे मृदा दिनाचे आयोजन संपन्न






**दि. ५ डिसेंबर २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, पुणे येथील मृदा विज्ञान विभागाच्या वतीने जागतिक मृदा दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र सरकाळे उपस्थित होते. यावेळी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ महानंद माने, मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. जे. डी. पाटील, मृदा विज्ञान विभाग प्रमुख डॉ. अविनाश गोसावी, सातारा येथील अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. जिवाजी मोहिते, कराड येथील रयत अथणी साखर कारखान्याचे युनिट प्रमुख श्री. रविंद्र देशमुख, पुणे येथील राज्य शासनाच्या उत्पादन शुल्काचे उपअधीक्षक श्री. उत्तमराव शिंदे आणि सहयोगी प्राध्यापक डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील पाटील म्हणाले की देशातील सर्वात मोठ्या विद्यापीठात कृषि महाविद्यालय, पुणे येथील मृदा विज्ञान विभाग हा ब्रिटिश काळापासून सुरू आहे. मातीचे महत्त्व ब्रिटिशांनी ओळखले होते म्हणून जवळपास एकशेवीस वर्षांपूर्वी सदर विभागाची निर्मिती ब्रिटिशांनी केली होती. या विभागाचे नुतनीकरण करून माती आणि पाणी परीक्षण प्रयोगशाळा अत्याधुनिक करण्यात आली आहे. राज्यातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी विद्यापीठ सातत्याने कार्यरत आहे. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राज्यातील साखर कारखान्यांच्या माध्यमातून तंत्रज्ञान प्रचार/प्रसार करण्यासाठी विविध सामंजस्य करार केले आहेत. जागतिक मृदा दिनाच्या निमित्ताने फक्त मातीचे पूजन करून चालणार नाही तर सेंद्रिय कर्बाचे प्रमाण कमी होण्याची कारणे शोधून जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी मृदा व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. त्यासाठी जागतिक अन्न व कृषि संघटनेच्या माध्यमातून या वर्षी मातीची तपासणी, निरीक्षण आणि व्यवस्थापन ही संकल्पना मांडली आहे. माती ही अनेक सुक्ष्म जीवाणूंची संजीवनी आहे म्हणून जमिनीचे भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्म चांगले असतील तरच तिचे आरोग्य चांगले राहते. म्हणून विशेषतः क्षारपड जमिनीची सुधारणा करण्यासाठी विद्यापीठाचे संशोधन प्रभावी ठरले असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. राजेंद्र सरकाळे यांनी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठ शेतकऱ्यांच्या हितासाठी अतिशय उत्तम कार्य करीत असल्याचे सांगितले. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पर्यावरणपूरक एकरी १०० टन खोडवा उस व्यवस्थापन प्रकल्प महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि सातारा जिल्ह्यातील ६ साखर कारखान्याच्या सहकार्याने ३०२२ शेतकर्यांच्या शेतावर राबविला आहे. या प्रकल्पामध्ये माती व पाणी परीक्षण आधारित एकरी १०० टन खोडवा उस उत्पादणासाठी आवश्यक तंत्रज्ञान शेतकर्यांन देण्यात आलेले आहे. हा देशातील पथदर्शी आणि अत्यंत महत्वाकांक्षी उपक्रम असून यावर्षी हा प्रकल्प ६००० शेतकर्यांच्या शेतावर राबविण्यात येईल असे त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी डॉ. जे. डी. पाटील आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की प्रतिकूल परिस्थितीतही विद्यापीठ तंत्रज्ञान प्रसाराचे प्रभावी कार्य करीत आहे. जागतिक तापमानवाढ, जमिनीचे खालावत असलेले आरोग्य आणि भू प्रदूषण या आवाहनाला प्रतिसाद देत असताना जमीन सुरक्षा संकल्पना लक्षात घेऊन संशोधन केले पाहिजे. त्या दृष्टीने कृषि महाविद्यालय, पुणे येथील मृदा विज्ञान विभागात सुरू असलेले कार्य कौतुकास्पद आहे असे गौरवोद्गार त्यांनी काढले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ महानंद माने यांनी केले. यावेळी श्री. जिवाजी मोहिते, श्री. रविंद्र देशमुख, श्री उत्तमराव शिंदे, डॉ. अविनाश गोसावी आणि डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके यांनी

आपले मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वृषाली घोरपडे यांनी केले तर आभार डॉ. अभय पाटील यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. अविनाश गोसावी आणि डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास साखर कारखान्याचे उस विकास अधिकारी, बँकेचे प्रतिनिधी, उस उत्पादक प्रगतशील शेतकरी, प्राध्यापक वर्ग व मोड्यूल विद्यार्थी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन





**दि. २ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील सेंटर ऑफ एक्सलन्स अद्ययावत व काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञान या प्रकल्पाने दि. २ ते ६ डिसेंबर, २०२४ दरम्यान आयोजीत केलेल्या प्रशिक्षणाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के होते. याप्रसंगी माजी संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, माजी कुलसचिव डॉ. मुकुंद शिंदे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजु अमोलिक, कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनील कदम व वरिष्ठ कापूस पैदासकार डॉ. पवन कुलवाल उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. विठ्ठल शिर्के म्हणाले की सन २०५० मध्ये वाढलेल्या लोकसंख्येला आवश्यक असलेल्या अन्नधान्ये, फळे व भाजीपाल्याची गरज भागविण्यासाठी फिल्ड स्पेक्ट्रोस्कोपी, हायपर स्पेक्ट्रल व मल्टीस्पेक्ट्रल या अद्ययावत तंत्रज्ञानाचा उपयोग होणार आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने तयार केलेले हे तंत्रज्ञान निश्चितच आदर्शवत असे आहे. विविध पिकांचे सुधारीत वाण विकसीत करण्यासाठी शास्त्रज्ञांना या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन पिकांचे दुर्लक्षीत मौलीक गुणधर्म, पौष्टीक अन्नद्रव्ये या घटकांसाठी होऊ शकतो. यावेळी डॉ. सुनील गोरंटीवार मार्गदर्शन करतांना म्हणाले की अद्ययावत तंत्रज्ञानाची माहिती होणे हा या प्रशिक्षणाचा उद्देश आहे. फिल्ड स्पेक्ट्रोस्कोपी, हायपर स्पेक्ट्रल व मल्टीस्पेक्ट्रल या विषयावरील प्रशिक्षणांचे आयोजन हे विद्यापीठाने वनस्पतीशास्त्र, मृदशास्त्र, वनस्पतीरोगशास्त्र व पाणी व्यवस्थापन या विभागांच्या मदतीने राष्ट्रीय पातळीवर आयोजीत केली पाहिजेत. डॉ. मुकुंद शिंदे यांनी कास्ट प्रकल्पांतर्गत वेगवेगळ्या विषयांवरील आयोजीत केलेल्या प्रशिक्षणांचा आढावा संक्षिप्त स्वरुपात सादर केला. डॉ. विजू अमोलिक यांनी या प्रशिक्षणाचा उपयोग विविध पीक पैदासकारांना प्रत्यक्ष शेतावर व प्रयोगशाळेत संशोधनासाठी होईल असे सांगितले. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. सुनील कदम यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकल्पाचे संशोधन सहयोगी डॉ. वैभव मालूंजकर यांनी तर आभार डॉ. पवन कुलवाल यांनी मानले. या प्रशिक्षणासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील शास्त्रज्ञ, अधिकारी उपस्थित होते.

## सूक्ष्म सिंचन प्रणाली या विषयावरील सात दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन




**दि. ३ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत असलेले काटेकोर शेती विकास केंद्र व एन.सी.पी.ए.एच., भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने सूक्ष्म सिंचन प्रणाली या विषयावरील सात दिवसीय कृषि अधिकारी प्रशिक्षण वर्गाचा उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि

विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के होते. यावेळी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. आर.डी. बनसोड, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. एस.बी. गाडगे, काटेकोर शेती विकास केंद्राचे प्रमुख संशोधक डॉ. एस.के. डिंगरे उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. विठ्ठल शिर्के म्हणाले की पाण्याच्या अतिवापरामुळे पिकांच्या मुळांचे नुकसान होऊन मुळांच्या शोषण क्षमतेवर परिणाम होतो. त्याचबरोबर जमिनीच्या भौतिक आणि जैविक गुणधर्मावर प्रतिकुल परिणाम होतात. परिणामी पिकांचे उत्पादन घटते. यासाठी सूक्ष्म सिंचन प्रणालीचा योग्य वापर करुन सिंचन व्यवस्थापन करणे ही काळाची गरज आहे. डॉ. आर. डी. बनसोड यावेळी मार्गदर्शन करतांना म्हणाले की सुरुवातीच्या काळात पाण्याच्या जास्त वापरामुळे जमिनी खराब झालेल्या आहेत. भरमसाठ पाणी देण्यापेक्षा पाहिजे तेवढे संतुलीत पाणी दिले तर पिकांची वाढ योग्य प्रकारे होते. सिंचन कार्यक्षमता ही योग्य सिंचन पध्दतींचा वापर करुन वाढविता येते. कार्यक्रमाचे स्वागत डॉ. एस.के. डिंगरे यांनी तर प्रस्ताविक डॉ. एस.बी. गाडगे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार केंद्राच्या यंग प्रोफेशनल इंजि. भाग्यश्री मोरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. अनिकेत चंदनशिवे तसेच राहुरी, कोपरगाव, पाथर्डी, नेवासा या तालुक्यातून ३० पेक्षा जास्त संख्येने मंडल कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषि सहाय्यक श्री. योगेश राजळे, यंग प्रोफेशनल इंजि. रंजन पांडे, भाग्यश्री मोरे, शांतनु कोहोकडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि वद्यापीठात जागतीक मृदा दिनाचे आयोजन संपन्न





**दि. ५ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील मृद विज्ञान विभाग व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त विद्यमाने कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक मृदा दिनाचे आयोजन राहुरी तालुक्यातील सडे येथील प्रगतशील शेतकरी श्री. प्रमोद धोंडे यांच्या शेतावर करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मृद विज्ञान विभागाचे विभाग प्रमुख डॉ. भीमराव कांबळे होते. याप्रसंगी आंतरविद्या जलसिंचन विभाग प्रमुख डॉ. विजय पाटील, मृदविज्ञान विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल दुरगुडे, सहयोगी प्राध्यापक डॉ. रितू ठाकरे, डॉ. श्रीगणेश शेळके, डॉ. देविदास खेडकर, डॉ. संजय तोडमल, डॉ. सुभाष घोडके, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी श्रीमती तागड, श्रीरामपूरचे उपविभागीय कृषि अधिकारी श्री. प्रविण गोसावी, वरिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. दादासाहेब धोंडे व राहुरीचे तालुका कृषि अधिकारी श्री. बापूसाहेब शिंदे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. भीमराव कांबळे म्हणाले की भारतीय संस्कृतीमध्ये मातीला खूप महत्त्व आहे. आपल्या मूलभूत गरजा पुरविण्याची क्षमता मातीमध्ये असून आता तिची क्षमता पूर्वीसारखी राहिली नाही. भरमसाठ रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीची जडणघडण बिघडली आहे. त्यामुळे जमिनीतील पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेले जिवाणू नष्ट होऊन पिकांची उत्पादकता कमी झाली आहे. जमिनीचा पोत सुधारण्यासाठी प्रथम माती व पाणी करून खते देणे गरजेचे आहे. डॉ. अनिल दुरगुडे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की माती, पाणी, हवा ही नैसर्गिक संसाधने असून त्यातील माती ही आपल्या जीवनाचा आधारस्तंभ आहे. मातीमधूनच आपल्याला पाणी तसेच विविध अन्नद्रव्य मिळतात. दरवर्षी पावसाळ्यात प्रती हेक्टर १६ टन माती वाहून जाते. या वाहून जाणाऱ्या पाण्याबरोबर जमिनीतील खते, जिवाणू व कर्बाचा समावेश होतो. माती जगविण्यासाठी आपल्याला दूरदृष्टी ठेवणे गरजेचे असून मातीचा आत्मा असलेला कर्ब वाढविण्यासाठी माती परीक्षणासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

श्री. गोसावी यांनी यावेळी कृषि विभागामार्फत सडे गावामध्ये घेतलेल्या उसामध्ये मूग व मटकी या प्रात्यक्षिकांबद्दल माहिती दिली. डॉ. रितू ठाकरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात श्री. बाळासाहेब गवते, श्री. शिवाजी धामोरे, श्री. पंडित साळुंखे, श्री. हरून पठाण व श्री. प्रमोद धोंडे या शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिकांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार श्री. प्रकाश धोंडे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषि विभागाच्या कृषि सहाय्यक श्रीमती पल्लवी ढोकचौळे व श्रीमती उषा गावडे यांनी विशेष प्रयत्न केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील बियाणे विभागामार्फत आदिवासी भागातील शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटप कार्यक्रम संपन्न

**दि. ३० डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या बियाणे विभागाच्या आदिवासी उपयोजना (TSP) अंतर्गत प्राप्त अनुदानातून मौजे





शिंगोशी, ता. कळवण, जि. नाशिक येथील आदिवासी शेतकरी बांधवांना रब्बी हंगामातील गहू व हरभरा पिकांच्या विविध वाणांच्या बियाणे वाटपाचा कार्यक्रम शेतकरी बांधवांच्या उपस्थितीत शिंगोशी या ठिकाणी पार पडला. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांचे नेतृत्वाखाली व संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांचे मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रभारी कुलसचिव तथा बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीन दानवले यांच्या उपस्थितीत एकूण २३४ शेतकऱ्यांना कमी पाण्यात जास्तीचे उत्पादन देणारे गहू वाणाचे अनुपम, अनुराग, नेत्रावती तसेच हरभरा पिकाचे विक्रम व विक्रांत या बियाण्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बिजोत्पादन अधिकारी डॉ. के. सी. गागरे, विपणन अधिकारी डॉ. डी. एस. ठाकरे व बियाणे प्रकल्पाचे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाप्रसंगी मौजे शिंगोशी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील तसेच महिला व पुरुष शेतकरी व परिसरातील पत्रकार बांधव उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये सूक्ष्म सिंचन प्रणाली विषयावर प्रशिक्षण संपन्न



**दि. ९ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये काटेकोर शेती विकास केंद्र, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, काटेकोर शेती व फलोत्पादनावरील राष्ट्रीय समिती (एनसीपीएएच), कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमानाने कृषि अधिकाऱ्यांचे सात दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक मा. विठ्ठल शिर्के, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड व जलसिंचन व निचरा विभागाचे प्रमुख डॉ. एस. बी. गाडगे यांचे मार्गदर्शन लाभले. सदर प्रशिक्षणात कृषि अधिकाऱ्यांसाठी विद्यापीठाच्या व इतर संस्थेच्या तज्ञांकडून सूक्ष्म सिंचन प्रकार व आराखडा, विद्राव्य खतांचा वापर, स्वयंचलित सिंचन प्रणालीचे कार्यतत्त्व, सिंचनासाठी मृद व पाण्याची प्रत, क्लायमेट स्मार्ट डीजीटल शेती, सूक्ष्म सिंचन निगा व देखभाल, आय.ओ.टी. तंत्रज्ञानावर आधारित सिंचन प्रणाली, सिंचनामध्ये मोबाइल एप्लिकेशनचा वापर, शेडनेट व पॉलीहाउस तंत्रज्ञान व विविध शासकीय योजनांची माहिती या विषयांवर सखोल मार्गदर्शन व प्रात्याक्षिके घेण्यात आले. सदर प्रशिक्षणाचे यशस्वी आयोजनासाठी काटेकोर शेती विकास केंद्राचे इंजि. रंजन पांडेय, इंजि. भाग्यश्री मोरे, इंजि. शांतनु कोहोकडे यांनी विशेष परिश्रम घेतले. श्री. योगेश राजळे यांनी प्रक्षेत्र व्यवस्थापन केले व प्रमुख संशोधक डॉ. सचिन डिंग्रे यांनी प्रशिक्षणाचे पूर्ण नियोजन पार पाडले.

## एक दिवसीय ड्रोन फवारणी प्रात्यक्षिकाचे आयोजन कासारे गावात संपन्न



**दि. १४ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या प्रोत्साहनातून एक दिवसीय ड्रोन फवारणी प्रात्यक्षिकाचे आयोजन कासारे, ता. पारनेर ,जि. अहिल्यानगर येथे आयोजन करण्यात आले होते. या प्रात्यक्षिकाचे आयोजन काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स आणि अटारी प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या प्रात्यक्षिकासाठी कृषि अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख आणि काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्सचे प्रमुख संशोधक डॉ. सुनील कदम आणि कृषि यंत्रे आणि शक्ती विभागाचे प्रमुख डॉ. सचिन नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ड्रोन तंत्रज्ञानाविषयी सविस्तर माहिती आणि तुर आणि कांदा पिकांवर ड्रोनने फवारणी करून ड्रोनचे प्रात्यक्षिक डॉ. गिरिषकुमार भणगे यांनी दिले. या प्रात्यक्षिकाचे आयोजन डॉ. शुभांगी घाडगे यांनी केले होते. या प्रात्यक्षिकासाठी कृषि विभागातील कर्मचारी, बचत गटाच्या महिला आणि कासारी गावातील शेतकरी उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे आभार कासारे गावाचे सरपंच श्री. शिवाजी निमसे यांनी मानले.

## जाधववाडी येथील अंजीर आणि सिताफळ संशोधन प्रकल्पास संचालक डॉ. जगदीश राणे यांची भेट





**दि. २० डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळपिके अंजीर आणि सिताफळ संशोधन प्रकल्प, जाधववाडी, ता. पुरंदर येथे राजस्थान, बिकानेर येथील भारतीय कृषि संशोधन परिषदेचे केंद्रीय कोरडवाहू उद्यानविद्या संस्थेचे संचालक डॉ. जगदीश राणे यांनी भेट दिली. यावेळी राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्पाचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. विष्णू गरंडे व महाराष्ट्र राज्य अंजीर उत्पादक संघाचे तांत्रिक सल्लागार श्री. प्रकाश कुलकर्णी उपस्थित होते. डॉ. जगदीश राणे प्रक्षेत्र भेटीदरम्यान मार्गदर्शन करतांना म्हणाले की वातावरणात होत असलेल्या बदलांमुळे अजैविक ताण सहन करणाऱ्या अंजीर आणि सिताफळ या फळपिकांच्या जातींबाबत संशोधन होणे गरजेचे आहे. यावेळी त्यांनी प्रकल्पात सुरु असलेल्या संशोधन कार्याचा आढावा घेतला व प्रयोगांची पाहणी केली. तसेच त्यांनी झेंडेवाडी येथील पुरंदर लक्ष्मी महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या फळे व भाजीपाला प्रक्रिया केंद्रास भेट दिली. यावेळी कंपनीच्या अध्यक्षा सौ. संगीता झेंडे यांनी आसपासच्या परिसरातील महिलांच्या सक्षमीकरणाच्या तसेच अंजीर, सिताफळ व इतर शेतमालाच्या अतिरिक्त उत्पादनावर प्रक्रिया करून आर्थिक उन्नती साधणे या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या स्मार्ट प्रकल्पाच्या अर्थसहाय्याने कंपनीची स्थापना केल्याचे नमूद केले. कंपनीचे संचालक श्री. विशाल खटाटे व पूजा फाळके यांनी विविध प्रक्रियायुक्त उत्पादने व कामकाज यावर सविस्तर माहिती दिली. संशोधन प्रकल्पाचे उद्यानविद्यावेत्ता डॉ. प्रदीप दळवे यांनी संशोधन प्रकल्पाची सद्यस्थिती व सुरू असलेल्या संशोधन कार्याचे सादरीकरण केले. यावेळी डॉ. युवराज बालगुडे यांनी आभार आभार मानले. याप्रसंगी वरिष्ठ संशोधन सहाय्यक सुनील नाळे, नितीश घोडके, संदीप लिंभोरे व सतीश काळे उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
डिसेंबर २०२४



## कसबे डिग्रज येथील कृषि तंत्र विद्यालयास नियंत्रक श्री. सदाशिव पाटील यांची भेट व मार्गदर्शन





**दि. ११ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज ता. मिरज येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे नियंत्रक श्री. सदाशिव पाटील यांनी भेट दिली. यावेळी कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज माळी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना श्री. सदाशिव पाटील म्हणाले की परदेशात कमी लोकसंख्या असून देखील कृषि आधारीत उद्योगाला मोठे महत्व आहे. त्यामुळे तुम्ही कृषि शिक्षण घेऊन जगाला समृद्ध करावे. कृषि आधारीत उद्योग मोठे आहेत त्यातून बळीराज्याला पुढे आणण्यात विद्यार्थ्यांनी कष्ट घ्यावेत. कृषि शिक्षण घेऊन स्वावलंबी होऊन बिजोत्पादन, गांडूळ शेती, रोप वाटिका, रेशीम शेती, दुग्ध व्यवसायाद्वारे रोजगार निर्माते म्हणून नावारूपास यावे असा आशावाद त्यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला. विद्यालयातील उपलब्ध सुविधा, शिक्षण, वसतिगृह याविषयी त्यांनी माहिती घेतली. प्राचार्य डॉ. मनोज माळी यांनी तंत्र विद्यालयाचा कामाचा आढावा सादरीकरण करून सादर केला. डॉ. प्रदीप मुर्कीभावी, श्री. प्रज्वल गागरे, श्री. नितीन घोरपडे, श्री. महेश केवले, श्री. राजू कापसे, श्री. गजानन डाखोरे, श्री. रवींद्र भगत यांनी कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन केले. यावेळी तंत्र विद्यालयातील ६० ते ६५ विद्यार्थी उपस्थित होते.

## धुळे येथील कृषि विज्ञान केंद्रांतर्गत साक्री तालुक्यातील छावडी गावामध्ये कापूस पीक कार्यशाळा संपन्न



**दि. ५ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या धुळे येथील कृषि विज्ञान केंद्रामध्ये विशेष कापूस प्रकल्पअंतर्गत मौजे छावडी, ता. साक्री येथे एकदिवसीय कापूस पिकाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून धुळे येथील आत्माचे प्रकल्प संचालक हितेंद्र सोनवणे उपस्थित होते. याप्रसंगी छावडी गावचे सरपंच श्री. लोटन मासुळे, धुळे लुपिन फाउंडेशनचे श्री. निलेश पवार, कृषि विद्या विभागाचे शास्त्रज्ञ श्री. जगदीश काथेपुरी, पीक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील व मृदा शास्त्रज्ञ डॉ. आतिश पाटील उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. दिनेश नांद्रे यांनी शेतकरी बांधवांनी श्री. दादा लाड तंत्रज्ञानाचा अवलंब करावा व या विशेष कापूस प्रकल्पामध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवून कापूस पिकाचे अधिकाधिक उत्पादन घ्यावे असे आवाहन केले. श्री. जगदीश काथेपुरी यांनी मार्गदर्शन करताना कापूस पिकाची लागवड तीन बाय एक फूट अंतरावर करावी, ४५ दिवसांच्या आत गळफांदी काढावी, गळफांदी व फळफांदी यातील फरक तसेच कापूस कमरे एवढा झाल्यावर किंवा ८५ ते ९० दिवसांनी कापूस पिकाचा मुख्य शेंडा खुडावा असे सांगून श्री. दादा लाड तंत्रज्ञानावर सखोल मार्गदर्शन केले. डॉ. पंकज पाटील यांनी ड्रोन द्वारे फवारणी व ड्रोन याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले व डॉ. आतिश पाटील यांनी जमिनीचे आरोग्य व त्याची देखभाल याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. जीवन दगडू राणे, श्री रमेश शिंदे यांनी परिश्रम घेतले.

मफुकृवि ई वार्ता
डिसेंबर २०२४

वर्ष :४, अंक क्रं. : ४८, डिसेंबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## धुळे कृषि विज्ञान केंद्रातर्फे भडणे येथे प्रक्षेत्र दिन साजरा




**दि. १३ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे व केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्यावतीने २०० एकर क्षेत्रावर दादा लाड कापूस पिकाचे तंत्रज्ञान प्रात्यक्षिके घेण्यात आले होते. त्या अनुषंगाने कापूस पिकाचा प्रक्षेत्र दिन मौजे भडणे ता. शिंदखेडा जि. धुळे येथे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे होते. यावेळी डॉ. पंकज पाटील, श्री जगदीश काथेपुरी, महीको कंपनीचे श्री. लंकेश जोगे, पोलीस पाटील श्री. युवराज माळी उपस्थित होते. यावेळी डॉ. दिनेश नांद्रे यांनी शेतकरी बांधवांनी दादा लाड कापूस तंत्रज्ञानाचा अवलंब करावा व या विशेष कापूस प्रकल्पामध्ये सहभाग नोंदवून शेतकरी बांधवांनी कापूस या पिकाचे अधिकाधिक उत्पन्न घ्यावे असे आवाहन केले. याप्रसंगी श्री. जगदीश काथेपुरी यांनी शेतकऱ्यांना दादा लाड कापूस तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन केले. दादा लाड कापूस तंत्रज्ञान मध्ये ३x१ फुट लागवड लागवड करून एकरी झाडांची संख्या १४८१४ बसतात तसेच ४५ दिवसाच्या आत गळ फांदी काढणे व ८५ दिवसांनी किंवा कापूस कमरे एवढा झाला की झाडाचा मुख्य शेंडा खुडावा त्यामुळे झाडांमध्ये हवा खेळती राहून कीड व रोगाचा प्रादुर्भाव कमी होतो. बोंडांना अधिक सूर्यप्रकाश मिळाल्याने बोंडांची वाढ अधिक होते. पुढील वर्षी शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त दादा लाड कापूस तंत्रज्ञानामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले. डॉ. पंकज पाटील यांनी ड्रोनद्वारे कापूस पिकावरील फवारणी व ड्रोन तंत्रज्ञान या विषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भडणे गावातील प्रगतशील शेतकरी श्री. उदय पाटील, श्री. सतीश माळी, श्री. हितेश गिरासे व कृषि विज्ञान केंद्राचे श्री. जीवन राणे, श्री. रमेश शिंदे यांनी परिश्रम घेतले.

## बोरविहीर येथे श्री दादा लाड कापूस तंत्रज्ञान पिकाचा प्रक्षेत्र दिन साजरा




**दि. १९ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे व केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे बोरविहीर ता.जि. धुळे. येथे दादा लाड तंत्रज्ञानाअंतर्गत कापूस पिकाचा प्रक्षेत्र दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील होते. यावेळी कृषि विज्ञान केंद्राचे कृषि विद्या विभागाचे शास्त्रज्ञ श्री. जगदीश काथेपुरी, कृषि विभागाचे कृषि सहाय्यक श्री. अमोल चव्हाण व श्री. चेतन गीते उपस्थित होते. यावेळी आपल्या मार्गदर्शनामध्ये डॉ. पंकज पाटील म्हणाले की शेतकऱ्यांनी दुसऱ्या कापूस वेचणीनंतर बोंड अळी नियंत्रणासाठी फवारणी करणे गरजेचे आहे. तसेच कीड व रोग नियंत्रणासाठी रासायनिक कीटकनाशकांऐवजी शेतकऱ्यांनी जैविक कीटकनाशकांचा वापर करावा. याप्रसंगी श्री. जगदीश काथेपुरी म्हणाले की कापूस पिकाची उत्पादकता वाढवण्यासाठी दादा लाड तंत्रज्ञान अत्यंत उपयुक्त असून शेतकऱ्यांनी कापूस लागवड करताना श्री दादा लाड कापूस तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होणार आहे. यावेळी ते पुढे म्हणाले की, दादा लाड तंत्रज्ञानाची त्रिसूत्री कापूस पिकाची ३x१ फूट अंतरावर

लागवड करावी, ४५ दिवसांच्या आत गळ फांदी काढावी व कापूस पिकाची उंची कमरे एवढी मर्यादित ठेवणे किंवा ८५ दिवसांच्या आत मुख्य शेंडा खुडणे इत्यादी गोष्टींचा अवलंब करावा. या तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याने कपाशी पिकामध्ये हवा खेळती राहते तसेच किड व रोगांचा प्रादुर्भाव कमी होऊन बोंडांचे वजन व बोंडातील कापसाचे वजन वाढून उत्पादनात वाढ होते असे निदर्शनात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बोरविहीर गावातील प्रगतशील शेतकरी श्री. शरद सोनवणे, श्री. रविंद्र पाटील व कृषि विज्ञान केंद्राचे श्री. जीवन राणे व श्री. रमेश शिंदे यांनी परिश्रम घेतले.

## मोहोळ कृषि विज्ञान केंद्रांतर्गत जागतिक मृदा दिन साजरा





**दि. ५ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, जि. सोलापूर यांनी जागतिक मृदा आरोग्य दिन दि. ४ डिसेंबर, २०२४ रोजी धोकबाभुळगाव, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे तर दि. ५ डिसेंबर, २०२४ रोजी सांगोला, जि. सोलापूर येथे साजरा केला. या वर्षीचा विषय होता मृदांचे संगोपन मोजा, देखरेख करा आणि व्यवस्थापन करा. या विषयाचा उद्देश मृदाचे योग्य स्वरूप समजून घेण्यासाठी अचूक मृदा माहिती आणि डेटा महत्त्वाचा असल्याचे अधोरेखित करणे व शाश्वत मृदा व्यवस्थापनासाठी सूज्ञ निर्णय घेणे हा होता. हा कार्यक्रम कृषि विभागाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. यावेळी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. तानाजी वाळकुंडे, विषय विशेषज्ञ प्रा. काजल म्हात्रे, प्रा. दिनेश क्षिरसागर, डॉ. पंकज माडावी व डॉ. विशाल वैरागर उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, कराड येथे राष्ट्रीय कृषि शिक्षण दिन साजरा



**दि. ६ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कऱ्हाड कृषि महाविद्यालयामध्ये डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय कृषि शिक्षण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शिवाजी पाटील होते. याप्रसंगी कृषि महाविद्यालयाचे प्रभारी सहायक कुलसचिव डॉ. सुनील अडांगळे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. ज्योती वाळके, शैक्षणिक प्रभारी डॉ. रामचंद्र हसुरे, मुख्य समुपदेशक डॉ. संपत कोळपे उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. शिवाजी पाटील म्हणाले की आजच्या आधुनिकीकरणाच्या काळामध्ये कृषि क्षेत्रासमोर असणारी आव्हाने बदलत आहेत. वैश्विक तापमानामध्ये वाढ होत आहे. हवामान व ऋतुचक्रामध्ये सातत्याने बदल होत आहेत. अशा परिस्थितीमध्ये शेतीमधील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कृषि क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, सेन्सर्स, ग्लोबल पोझिशनिंग सिस्टम यांसारख्या काटेकोर शेतीमधील अत्याधुनिक प्रगत तंत्रज्ञानाचा वापर होणे आवश्यक आहे. देशातील साठ टक्के लोकसंख्या शेतीवर विसंबून आहे. देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये शेती क्षेत्राचा अठरा टक्के वाटा आहे. या सर्व बाबींचा विचार करता कृषि क्षेत्र हे विकासात एक महत्त्वपूर्ण घटक असल्याचे दिसून येते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ज्योती वाळके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अर्चना ताठे यांनी तर आभार डॉ. सुनील अडांगळे यांनी मानले.

## बोरगांव येथील कृषि विज्ञान केंद्रांतर्गत महागाव येथे घेवडा प्रात्यक्षिक शिवार फेरी व चर्चासत्राचे आयोजन संपन्न



**दि. २० डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या बोरगाव येथील कृषि विज्ञान केंद्र व कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे महागाव येथे घेवडा प्रात्यक्षिक प्लॉटमध्ये शिवार फेरी व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. महेश बाबर होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन उपविभागीय कृषि अधिकारी श्री. रमेश देशमुख होते. याप्रसंगी श्री. हरिश्चंद्र धुमाळ, श्री. सागर सकटे व श्री. प्रवीण नलवडे उपस्थित होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शन करतांना श्री. रमेश देशमुख म्हणाले की घेवडा उत्पादकता वाढीसाठी नवीन वाण व बीबीएफ यंत्राने पेरणी फायदेशीर ठरेल. राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाद्वारे विकसित केलेल्या अधिक उत्पन्न देणारे वाण फुले राजमा व फुले विराज या वाणाची प्रक्षेत्र चाचणी कृषि विज्ञान केंद्रामार्फत राबविण्यात येत आहे. या प्रक्षेत्र चाचणीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दोन्ही वाणांतील फरक माहिती व्हावे तसेच अधिक उत्पन्न देणारे वाण शेतकऱ्यांना निवडता यावे, यासाठी यासाठी प्रक्षेत्र चाचणी घेतली जात आहे. या प्रक्षेत्र चाचणीच्या प्रायोगिक प्लॉटमध्ये शिवार फेरी आयोजित करून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. मर रोग, रस शोषण करणाऱ्या किडीचे व्यवस्थापन, गरजेनुसार सुक्ष्म अन्नद्रव्ये व्यवस्थापन या विषयावर श्री. धनाजी फडतरे व डॉ. भूषण यादगीरवार यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठातील विविध वाणाचे वैशिष्ट्य व त्याची उपलब्धता या विषयावर डॉ. महेश बाबर यांनी माहिती दिली. बियाणे टोकन यंत्र व बीज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक श्री. सागर सकटे व श्री. प्रवीण नलवडे यांनी घेतले.

## मुक्ताईनगर कृषि महाविद्यालयाच्या वतीने हरताळा येथे श्रम संस्कार शिबिर उत्साहात संपन्न




**दि. २३ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या मुक्ताईनगर कृषि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या एककाद्वारे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजन मौजे हरताळे येथे करण्यात आले होते. शिबिराच्या समारोपप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. अविनाश कोळगे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून हरताळे येथील विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन श्री. आनंदराव देशमुख होते. याप्रसंगी सहयोगी प्राध्यापक डॉ. गणेश देशमुख आणि शेतकरी श्री. सोपान दांडगे उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी नामदेव धुर्वे यांनी सात दिवसीय शिबिराचा आढावा सादर केला. यानंतर शिबिरामध्ये विशेष कामगिरी केलेल्या स्वयंसेवक व स्वयंसेविका यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. संजीवनी घोरपडे आणि देव उगवे या स्वयंसेवकांनी शिबिरातील अनुभव कथन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी केकाने हिने केले तर आभार ओम स्वामी यांनी केले. या श्रम संस्कार शिबिराच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी श्री. नामदेव धुर्वे आणि सहायक राष्ट्रीय सेचा योजनेचे अधिकारी डॉ. कुशल ढाके आदींनी परिश्रम घेतले.

मफुकृवि ई-वार्ता
डिसेंबर २०२४



## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे कृषि शिक्षण दिवस साजरा







**दि. ३ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे भारताचे पहिले राष्ट्रपती तसेच भारताचे पहिले कृषि मंत्री डॉ. राजेंद्र प्रसाद यांची जयंती कृषि शिक्षण दिवस म्हणून महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. अविनाश कोळगे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. गणेश देशमुख तसेच श्री. एकनाथराव खडसे टॅलेंट स्कूल, मुक्ताईनगरचे शिक्षक श्री. दीपक पाटील आणि श्री. प्रमोद कोळी यांची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. आपल्या मार्गदर्शनात डॉ. अविनाश कोळगे म्हणाले की, कोविड काळातही सर्व थांबले परंतु कृषि व कृषी आधारित उद्योग हे जोमाने सुरू होते, त्यामुळे कृषि शिक्षण हे काळाची गरज आहे. तसेच कृषि शिक्षणासाठी प्रवेश हा १२वी सायन्स या शाखेतून उत्तीर्ण झाल्यावर विद्यार्थी विविध प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करून घेऊ शकतात असेही ते म्हणाले. डॉ. गणेश देशमुख यांनी प्रतिपादन केले की, विद्यार्थ्यांना कृषि क्षेत्र आजच्या वाढत्या लोकसंखेच्या काळात खूप महत्वाचे आहे, तसेच शेती व शेतीवर आधारित उद्योगांमूळे देशाचा जी. डी. पी. वाढत आहे त्यामूळे या क्षेत्रात रोजगाराच्या संधी अमाप आहेत. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव, श्री. प्रशांत नागे, डॉ. बाळासाहेब रोमाडे, श्री. नामदेव धुर्वे, डॉ. कुशल ढाके, डॉ. तुषार भोसले, डॉ. सागर बंड, डॉ. रवींद्र जाधव आणि सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्याची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. नामदेव धुर्वे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. कुशल ढाके यांनी केले. कार्यक्रमाला श्री. एकनाथराव खडसे टॅलेंट स्कूल मुक्ताईनगरचे ७० विद्यार्थी आणि महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, श्री. नामदेव धुर्वे आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे जागतीक मृदा दिवस उत्साहात साजरा



**दि. ५ डिसेंबर २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे जागतिक मृदा दिवस महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषिविद्या शाखेचे विभाग प्रमुख डॉ. अविनाश कोळगे होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून मृदाशास्त्राचे विभाग प्रमुख डॉ. रमेश चौधरी उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे श्री. प्रशांत नागे, डॉ. बाळासाहेब रोमाडे, प्रा.नामदेव धूर्वे, डॉ. कुशल ढाके, डॉ. तुषार भोसले, डॉ. सागर बंड, डॉ. मनिषा पालवे व श्रीमती सोमाणी उपस्थित होते. यावेळी डॉ. अविनाश कोळगे यांनी बिघडत चाललेले जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृतीची गरज असल्याचे नमूद केले. डॉ. रमेश चौधरी यांनी जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक वृंद तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रविंद्र जाधव यांनी केले तर आभार डॉ. सागर बंड यांनी मानले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे बँकिंग क्षेत्रात रोजगाराच्या संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन






**दि. ३१ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे कृषि पदवी अभ्यासक्रमात २०२४–२५ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या दीक्षारंभ कार्यक्रमाअंतर्गत सारथी एजुकेशन, छत्रपती संभाजीनगर आणि कृषि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बँकिंग क्षेत्रात रोजगाराच्या संधी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. याप्रसंगी छत्रपती संभाजीनगर येथील सारथी एजुकेशनचे संचालक श्री. सिद्धेश्वर कोंगे आणि श्री. संजीत कदम हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी डॉ. अविनाश कोळगे. डॉ. रियाज शेख, डॉ. कुशल ढाके आणि डॉ. सागर बंड उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. संदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत यामुळे विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी श्री. सिद्धेश्वर कोंगे यांनी कृषि पदवीधर झाल्यानंतर विविध क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत हे सांगतांना बँकांमध्ये विविध जागांसाठी स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात असे सांगितले. बऱ्याच स्पर्धा परीक्षांचा अभ्यासक्रम हा एकच आहेत त्यामुळे एकाच अभ्यासमद्धे विविध पदांसाठीच्या स्पर्धा देता येतात असेही सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कुशल ढाके यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. सागर बंड यांनी केले. कार्यक्रमाला कृषि महाविद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचारी आणि महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

# बैठका

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात विद्या परिषदेची १२३ वी बैठक संपन्न



**दि. १६ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे विद्या परिषदेची १२३ वी बैठक महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शिक्षण विभागाचे माजी उपमहासंचालक तथा उदयपूर येथील महाराणा प्रताप कृषि व तंत्रज्ञान विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. एन.एस. राठोर, निमंत्रीत सदस्य श्री. भारत भोजने, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, कृषि तंत्रज्ञानाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, कार्यक्षेत्रातील पीक विशेषज्ञ तसेच विविध संशोधन प्रकल्पांचे प्रमुख शास्त्रज्ञ उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये मुंबई दूरदर्शन सह्याद्री वाहिनीची कृषि कार्यक्रम सल्लागार समितीची बैठक संपन्न






**दि. १३ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व दूरदर्शन सह्याद्री वाहिनी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि कार्यक्रम सल्लागार समिती बैठकीचे आयोजन विद्यापीठामध्ये करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे होते. यावेळी मुंबई येथील दूरदर्शनचे कार्यक्रम निर्माता श्री. भारत हरणखुरे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, पुणे येथील दूरदर्शन केंद्राचे कार्यक्रम निर्माता श्री. विनायक मोरे, मुंबई दूरदर्शनचे कार्यक्रम निर्माता श्री. विजय मोदड व प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. पंडित खर्डे उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की सह्याद्री वाहिनीवरील शेतीविषयक कार्यक्रम शेतकऱ्यांमध्ये विशेष लोकप्रिय आहेत. सध्या शेतीमध्ये डिजीटल तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठात ड्रोन, रोबोट व सेंन्सर्सवर आधारीत पाणी व्यवस्थापन यावर नाविन्यपूर्ण संशोधन सुरु आहे. या तंत्रज्ञानाचा प्रसार दूरदर्शनच्या माध्यमातून जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत झाला पाहिजे. डॉ. रविंद्र बनसोड आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की माहे जानेवारी ते मार्च हे तीन महिने पाणलोट क्षेत्र विकास, सिंचन व्यवस्थापन व शेतीची पेरणीपूर्वीची तयारी करण्यासाठी महत्वाचे असतात. या कालावधीत प्रसारीत होणाऱ्या शेतीविषयक कार्यक्रमात विद्यापीठाने तयार केलेल्या तंत्रज्ञानाच्या शिफारशी शेतकऱ्यांपर्यंत गेल्या पाहिजेत.

यावेळी श्री. भरत हरणखुरे यांनी मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून दाखविले. यावेळी बैठकीला उपस्थित असलेले विभाग प्रमुख, कृषि विज्ञान केंद्रांचे प्रतिनिधी, प्रगतशील शेतकरी यांच्याबरोबर झालेल्या चर्चेतून माहे जानेवारी ते मार्च, २०२५ या कालावधीत होणाऱ्या कृषि विषयक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. पंडित खर्डे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन सदाफळ यांनी तर आभार श्री. विनायक मोरे यांनी मानले. या बैठकीसाठी विद्यापीठातील विभाग प्रमुख, कृषि विज्ञान केंद्रांचे शास्त्रज्ञ, पशुसंवर्धन, जलसंपदा विभाग आणि हवामान केंद्राचे अधिकारी उपस्थित होते.



## क्रीडा

## महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये विद्यापीठस्तरीय कृषि तंत्रज्ञान क्रीडा स्पर्धेचे आयोजन





**दि. १६ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे विद्यापीठस्तरीय कृषि तंत्रज्ञान क्रीडा स्पर्धा २०२४-२५ आयोजीत करण्यात आल्या होत्या या स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन

संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कुलसचिव डॉ. नितीन दानवले, कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान, क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी व माजी क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील म्हणाले की खेळामुळे आपले स्वास्थ्य चांगले राहते. मनावरील ताण कमी होवून मन एकाग्र होण्यास मदत होते. खो-खो व हॉलीबॉल हे दोन्ही खेळ सांघीक आहेत. या खेळांमध्ये एकट्याच्या प्रयत्नामुळे जिंकता येत नाही तर जिंकण्यासाठी संपूर्ण संघाला एकत्रितपणे प्रयत्न करावे लागतात. त्यातुनच येणाऱ्या संघभावनेने जीवनातील अडचणींवर मात करता येते. यावेळी डॉ. साताप्पा खरबडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत बोडके यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सहभागी संघांनी उपस्थित मान्यवरांना मानवंदना दिली. पुणतांबा येथील कृषि तंत्र विद्यालयातील खेळाडू देवेंद्र गिते याने सर्व खेळाडूंना शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. राहुल खुळे यांनी मानले. या कृषि तंत्रज्ञान क्रीडा स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील नऊ कृषि तंत्रज्ञान विद्यालयातील ३४ संघ सहभागी झाले होते. यामध्ये १५५ मुली व १७० मुले असे एकुण ३२५ विद्यार्थी, २० पंच सहभागी झाले होते. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विभाग प्रमुख, अधिकारी, घटक विद्यालयांचे प्राचार्य, संघ प्रमुख व विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

## विद्यापीठस्तरीय क्रीडा स्पर्धेत पुणे जिल्हा संघ विजयी









**दि. १९ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषि तंत्रज्ञान शिक्षण विभागाच्या विद्यापीठस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये खो-खो व व्हॉलीबॉल सांघिक खेळाचा समावेश केला होता. यामध्ये कृषि तंत्र विद्यालये व कृषि तंत्र निकेतने, पुणे जिल्हा खो-खो मुलांच्या संघाने विजेतेपद पटकावले. विद्यापीठांतर्गत असणाऱ्या दहा जिल्ह्यांतील एकूण ३६ संघ व ३५५ विद्यार्थी यांनी या क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला होता. सदर स्पर्धेसाठी कृषी तंत्र विद्यालय, मांजरी फ़ार्मचे प्राचार्य डॉ. संतोष यादव यांच्या मार्गदर्शनाखाली कु. कुणाल फडतरे याच्या नेतृत्वाखाली खो-खो खेळाचे विजेतेपद पटकावले. सोबतच व्हॉलीबॉलमध्ये कु. वैष्णवी रंधवे, कर्णधार हिच्या नेतृत्वाखाली तृतीय क्रमांक पटकाविला. अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांच्या हस्ते विजयी संघाला पारितोषिक व प्रशस्तीपत्रक यांचे वाटप करण्यात आले. कृषि तंत्रज्ञान विभागाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्या. संघ व्यवस्थापक म्हणून माधव बिलाडी, सुवर्णा नवसुपे, दत्तात्रय अडलिंगे, सविता वळकुंडे, एकनाथ बोऱ्हाडे, मोहन बागल, पल्लवी भांडवलकर, कानिफ़नाथ ढोबळे यांनी काम पाहिले.

## कोल्हापूर येथील राजर्षि छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयाचे आविष्कार स्पर्धेमध्ये घवघवीत यश

**दि. २३ डिसेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या कोल्हापूर येथील राजर्षि छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयाने मालेगाव कॅम्प नाशिक येथे महात्मा गांधी विद्यामंदिराच्या प्रांगणात आंतरमहाविद्यालयीन आविष्कार स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेच्या पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्पांचे पोस्टर तथा मॉडेल्सद्वारे सादरीकरण करत एकूण दहा पारितोषिके पटकावत संशोधन क्षेत्रात कोल्हापूरचा डंका वाजविला. पदवीस्तरीय स्पर्धेत मानव्यशास्त्र आणि फाईन आर्टस् गटात महाविद्यालयाच्या यश अंबाडगे याने प्रथम क्रमांक पटकावला, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान गट, कृषि आणि पशुसंवर्धन गट, शुद्ध विज्ञान गट यामध्ये अनुक्रमे जयराज बिराजदार, आस्था देशमुख, निकिता रपटवार यांनी द्वितीय क्रमांक मिळविला तर वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा गटात खुशाल सोनवणे याने तिसरा क्रमांक पटकाविला. पदव्युत्तरपदवीस्तरीय स्पर्धेत अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान गटात आणि कृषि आणि पशुसंवर्धन गटात अनुक्रमे आसमा शेख आणि गायत्री अवताडे यांनी तिसरा क्रमांक पटकावला. वैद्यकशास्त्र आणि औषधनिर्माण गटात नेहा राऊत, रोहन चव्हाण आणि कृष्णा शिंदे यांनी अनुक्रमे



प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवून या गटात महाविद्यालयाला एकतर्फी विजय मिळवून दिले. या सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सतीश बुलबुले, आविष्कार स्पर्धेसाठीचे संघव्यवस्थापक डॉ. ज्ञानेश्वर पतंगे, किटकशास्त्र विभागाचे डॉ. अभय बागडे आणि कृषि रसायनशास्त्राचे डॉ. दिपक पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले.



## जानेवारी महिन्यातील कामांचा तपशील



**ऊस**

- ऊस बांधणीच्या अवस्थेत असलेल्या आडसाली ऊसाला हेक्टरी १६० किलो नत्र (३४७ किलो युरिया) (७.७१ पोती), ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) (११.८ पोती) आणि ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) (३.१६ पोती) खतमात्रा देऊन ऊस बांधणी करावी. को ८६०३२ या ऊस जातीसाठी २५% जास्त रासायनिक खतमात्रा वाढवून द्यावी.
- पूर्व हंगामी ऊसातील आंतरपिकाची उदा. बटाटा, फ्लॉवर, कोबी, मुळा, गाजर व कांदा इ. पिकांची काढणी त्यांची अवस्था पाहून करावी.
- पूर्व हंगामी ऊसासाठी जानेवारीच्या दुसऱ्या आठवडयात संजीवकांच्या तिसऱ्या फवारणीसाठी हेक्टरी ३५० लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) १४ ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) १४ ग्रॅम, ३५०० ग्रॅम १९:१९:१९, ८७५ ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व १७५० ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी.
- पूर्व हंगामी ऊसासाठी जानेवारीच्या चौथ्या आठवडयात संजीवकांच्या चौथ्या फवारणीसाठी हेक्टरी ३५० लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) १५ ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) १५ ग्रॅम, ३७५० ग्रॅम १९:१९:१९, ९३७ ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व १८७५ ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी.
- १२ ते १६ आठवडे झालेल्या ऊसाला नत्राचा तिसरा हप्ता द्यावा. यासाठी हेक्टरी ३४ किलो नत्र (७४ किलो युरिया) (१.६५ पोती) वापरावे, नत्रयुक्त खताबरोबर ६:१ या प्रमाणात निंबोळी पेंडीची भुकटी खतामध्ये मिसळून द्यावी.
- ऊसाची लागण सलग सरीवर भारी जमिनीत १२०–१५० सें.मी. अंतरावर करावी अथवा ९०–१८० सें.मी. जोड ओळ पध्दतीने लागवड करावी.
- लागणीसाठी फुले ०२६५, को ८६०३२, एमएस १०००१, फुले ०९०५७ नवीन प्रसारीत वाण फुले ११०८२, फुले ऊस १५०१२ आणि फुले ऊस १३००७ यापैकी कोणत्याही कोणत्याही वाणांची निवड करावी. लागणीसाठी एक डोळयांच्या टिपऱ्या वापराव्यात.
- लागणीपूर्वी बेण्यास १० ग्रॅ कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात बेणे १०–१५ मि नीटे बुडवावे व नंतर ॲसिटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जीवाणू अनुक्रमे १ किलो आणि १२५ ग्रॅम १० प्रति लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये टिपऱ्या ३० मिनीटे बुडवून नंतर लागण करावी यामुळे नत्र खताची ५०% व स्फुरद खताची २५% बचत होते.
- सुरु ऊसाच्या लागणीच्या वेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र (५५ किलो युरिया) (१.२२ पोती), ६० किलो स्फुरद (३७५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) (८.३३ पोती), ६० किलो पालाश (१०० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) (२.२२ पोती) द्यावे. तसेच रासायनिक खतांबरोबर मृद परीक्षणानुसार झिंक सल्फेट २० किलो, फेरस सल्फेट २५ किलो, मॅंगेनीज सल्फेट १० किलो आणि बोरॅक्स ५ किलो प्रति हेक्टरी या प्रमाणात चांगल्या कुजलेल्या शेणखतात १०:१ या प्रमाणात मिसळून २ ते ३ दिवस मुरवून एकत्रित करुन खते रांगोळी पध्दतीने ४ ते ५ सें.मी. खोलीवर द्यावीत. को. ८६०३२ ऊसासाठी २५% रासायनिक खतांची मात्रा जास्त द्यावी.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास १ ते ४ आठवडयापर्यंत ऊसाच्या वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी ३० किलो नत्र, ९ किलो स्फुरद व ९ किलो पालाश ही अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने चार समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.

- बेणे मळयातील बेणेच ऊस लागवडीसाठी वापरावे. तीन वर्षातून एकदा ऊसाचे बियाणे बदलावे, खोडव्याचा ऊस लागणीसाठी वापरु नये.
- मध्यम प्रतिच्या जमिनीत ओली लागण करावी. भारी व चोपण जमिनीत कोरडी लागण करावी.
- ऊस लागणीनंतर ४–५ दिवसांनी वापसा आल्यावर हेक्टरी ५० ग्रॅम अॅट्राझिन प्रति १० लिटर पाण्यात विरघळून संपूर्ण जमिनीवर हात पंपाने सकाळी किंवा सायंकाळी फवारावे किंवा मेट्रीब्युझीन १५ ग्रॅ १० लिटर पाण्यात मिसळून जमि नीवर फवारणी करावी. फवारणी करतांना फवारलेली जमीन तुडवू नये.
- सुरू ऊसामध्ये उन्हाळी भुईमूग, कांदा, काकडी, पानकोबी, फुलकोबी, नवलकोल, मेथी व कोथींबीर, भेंडी इ. पिके आंतरपिके म्हणून घ्यावीत.
- ऊस तोडणी नंतर शेतातील पाचट पेटवू नये. खोडवा ठेवताना पाचटाची कुट्टी करू नये अगर पाचट एकाआड एक सरीत ठेवू नये.
- ऊस तोडणीनंतर पाचट सलग सरीत दाबून ऊसाचे बुडखे मोकळे करून घ्यावेत.
- ऊसाचे बुडखे धारदार कोयत्याने जमिनीलगत छाटून घ्यावेत व त्यावर १० ग्रॅ कार्बेन्डॅझीम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाचटावर प्रति हेक्टरी ८० किलो युरिया, १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट टाकावे. त्यानंतर १० किलो पाचट कुजविणारे जीवाणू शेणखत कंपोस्ट खतामध्ये मिसळून पाचटावर टाकावेत.
- पहिले पाणी दिल्यानंतर ३ ते ४ दिवसांनी वापसा आल्यानंतर पहारीच्या सहाय्याने हेक्टरी १२५ किलो नत्र, ५८ किलो स्फुरद, ५८ किलो पालाश यांचे मिश्रण तसेच झिंक सल्फेट २० किलो, फेरस सल्फेट २५ किलो, १० किलो मॅंगेनीज सल्फेट आणि ५ किलो बोरॅक्स प्रति हेक्टरी या प्रमाणात चांगल्या कुजलेल्या शेणखतात १०:१ या प्रमाणात मिसळून २ ते ३ दिवस मुरवून एकत्रित करुन बुडख्यापासून सरीच्या एका बाजूला १५ ते २० सें.मी. अंतरावर व १५ सें.मी. खोलीवर पहारीने छिद्र घेवून द्यावे. दोन छिद्रातील अंतर ३० सें.मी. ठेवावे.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास १ ते ४ आठवडयापर्यंत ऊसाच्या वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी ३० किलो नत्र, ९ किलो स्फुरद व ९ किलो पालाश हि अन्नद्रव्ये ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.
- किडग्रस्त/तणग्रस्त लागण क्षेत्र असल्यास खोडवा ठेवू नये. तसेच कमीत–कमी हेक्टरी १ लाख ऊसांची संख्या असलेल्या क्षेत्रातच खोडवा ठेवावा.

### भुईमूग (उन्हाळी)

- जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात पेरणी करता येईल अशा बेताने पेरणीपुर्व ओलीत करावे.
- पेरणीसाठी सुधारीत फुले उन्नती, टी.ए.जी.२४,टी.जी.२६, टी.पी.जे.४१,जे.एल.५०१ या वाणापैकी निवड करावी.
- उन्हाळी भुईमूगाची पेरणी १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी.
- पेरणीचे अंतर ३० x १० से.मी. ठेवावे त्यासाठी हेक्टरी १०० ते १२० किलो बियाणे वापरावे.
- पेरणीपुर्वी २.५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक प्रती किलो बियाणास वापरून बीजप्रकिया करावी.
- बुरशीनाशकाचे प्रक्रियेनंतर १ किलो बियाणांस २५ ग्रॅम रायझोबियम व २५ ग्रॅम स्फुरद विरघळणाऱ्या जीवाणू खतांची बीजप्रक्रिया करावी.
- पेरणीच्या वेळी भुईमुग पिकास हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद द्यावे. स्फुरद खताची मात्रा शक्यतो सिंगल सुपर फॉस्फेटच्या माध्यमातून दयावी. यासोबत पिकास हेक्टरी १२५ किलो जिप्समचा पहिला हप्ता द्यावा.
- जस्त व बोरॉन या सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असलेल्या जमिनीत दोन वर्षातुन एकदा हेक्टरी २५ किलो झिंक सल्फेट व ५ किलो बोरॅक्स, सेंद्रिय खतांसोबत जमिनीतुन पेरणीपुर्वी द्यावे.

### हरभरा व्यवस्थापन

- जिरायती पिकांच्या वाणांची पक्वतेनुसार काढणी व मळणी करावी.
- बागायती हरभऱ्यासाठी घाटे भरण्याच्या अवस्थेत पाणी दयावे.
- किड व रोगांपासून संरक्षण करण्यासाठी शिफारशीत उपाययोजना करावी.

### रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवाडा– पक्षांपासून संरक्षण करावे.
- दुसरा पंधरवाडा –ज्वारीच्या दाण्याच्या टोकाजवळ काळा ठिपक्याचे लक्षणे दिसताच ज्वारीची काढणी करावी व ८ ते १० दिवस कणसे उन्हात वाळवावीत.

### गहू

- उशिरा पेरणी केलेल्या गहू क्षेत्रातील जमिनीत कायमस्वरूपी ओलावा राहून पीक क्षेत्रात थंड हवामान राखण्यासाठी पिकास नेहमीपेक्षा कमी अंतराने म्हणजे १५ दिवसांनी योग्य मात्रेत पाणी दयावे.
- उशिरा पेरणी केलेल्या गहू क्षेत्रात तापमान कमी रहावे म्हणून गव्हासाठी तुषार सिंचनाचा वापर करावा. तुषारने शेवटचे पाणी ८० ते ८५ दिवसांदरम्यान दयावे.

- अवेळी पडलेल्या पावसामुळे किंवा तुषार पध्दतीने घेतलेल्या गहू क्षेत्रात दाणे काळे पडण्याची शक्यता असते ते टाळण्यासाठी दाणे भरण्याच्या अवस्थेत मेन्कोझेब + कॉपर ऑक्सिक्लोराईड, प्रत्येकी २० ग्रॅम, १० लि. पाण्यातून फवारावे.
- गहू पिकावर पेरणीनंतर ५५ व ७० दिवसांनी, दोन वेळा १९:१९:१९ या विद्राव्य खताची १० लि. पाण्यात २०० ग्रॅम या प्रमाणात फवारणी करावी.
- गहू पिकातील अरुंद पानांच्या तण नियंत्रणासाठी पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी प्रतिहेक्टरी आयसोप्रोटयूरॉन (५०टक्के), दोन ते तीन किलो ६०० ते ८०० लिटर पाण्यातून फवारावे. तसेच रुंद पानांच्या तण नियंत्रणासाठी पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी प्रतिहेक्टरी मेटसल्फ्यूरॉन मिथाईल (२० टक्के),२० ग्रॅम, ६०० ते ८०० लिटर पाण्यातून फवारावे.
- तांबेरा रोगास बळी पडणाऱ्या गहू वाणांवर नारंगी अथवा काळा तांबेरा रोगाची लागण दिसून येताच मॅन्कोझेब या बुरशीनाशकाची १.५ किलो ५०० लिटर पाण्यातुन फवारणी करावी.
- गहू पिकावर मावा आणि तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास त्यांच्या नियंत्रणासाठी जैविक घटकांमध्ये मेटान्हिझिअम ॲनिसोपली १.१५ डबल्यू पी, ४० ग्रॅम किंवा व्हर्टिसिलीअम लेकॅनी १.१५ डबल्यू पी, ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी घेवून १० ते १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. रासायनिक पध्दतीने नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम २५ डबल्यू जी १ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे १५ दिवसांच्या अंतराने प्रादुर्भाव तीव्रता बघुन दोन फवारण्या कराव्यात.
- टिप– रासायनिक किटकनाशकांचा वापर करतेवेळी सदर किटकनाशकाचे लेबल क्लेम असल्याची खात्री करूनच फवारणी करावी.

प्रकाशक : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण
प्रमुख संपादक : **डॉ. सचिन सदाफळ**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
सहसंपादक : **श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र
डिझाईनर : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र
मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७६३/२०२५